MHAU060023092018

## फौजदारी किरकोळ अर्ज क्र. ५५२/२०१८ मध्ये निशाणी क्र. १५ वरील आदेश

**( आरती संजय चव्हाण व इतर वि. संजय अर्जुन चव्हाण )**

१. प्रस्तुत प्रकरण अर्जदार हिने कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५ मधील कलम १२ प्रमाणे दाखल केले आहे. तसेच, प्रस्तुत अर्जात सामनेवाला यांचेकडून अर्जदार यांचेकरीता रक्कम रुपये १०,०००/– दर महिना व अर्जदार क्र. २ व ३ यांचेकरीता प्रत्येकी रक्कम रुपये ३,०००/– अशी एकुन रक्कम रुपये १६,०००/– अंतरीम खावटी मिळणेकामी कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५ मधील कलम २३ प्रमाणे दाखल केला आहे.

२. अर्जदार हिचे थोडक्यात कथन असे की, अर्जदार व सामनेवाला क्र.१ यांचा विवाह हिंदु रितीरिवाजाप्रमाणे दिनांक ११.०५.२०१४ रोजी मौजे उंबरखेडा येथे झाला. सदर विवाहाचा खर्च अर्जदाराच्या आई वडीलांनी केला. अर्जदार क्र. १ ही विवाहानंतर मौजे नांदगाव तांडा ता. सोयगाव जि. औरंगाबाद येथे सामनेवाला यांच्याकडे नांदावयास गेली असता सामनेवाला यांनी अर्जदार हिला एक वर्ष व्यवस्थीत नांदवले. त्यांनतर सामनेवाला हे अर्जदार हिस विनाकारण शिवीगाळ करणे, टोचुण बोलणे, तुझ्या बापाने हुंडा कमी दिला, असे म्हणत असे. अर्जदार हिला सामनेवाला क्र. १ यांच्या विवाह संबंधातुन अर्जदार क्र. २ व ३ अशी दोन अपत्य झाल्यानंतर सामनेवाला क्र. १ ते ७ हे अर्जदार हिला माहेरहुन ५०,०००/– रुपये घेवून येणेकरीता तगादा लावुन शिवीगाळ व मारहाण करीत असे. तसेच उपाशी पोटी ठेवीत असे. त्यानंतर अर्जदार ही गैरअर्जदार क्र. १ सोबत सुरत येथे राहण्यास गेली असता तेथेही गैरअर्जदार याने अर्जदार हिला त्रास दिला. त्यानंतर अर्जदार हिने महिला तक्रार निवारण केंद्र औरंगाबाद येथे तक्रार दाखल केली असता तेथील सुनावणी नंतर अर्जदार हिस नांदण्यास गैरअर्जदारांकडे पाठविले होते. परंतु दोन महिने चांगले नांदविले व त्यानंतर अर्जदार हिला मोलमजुरी कामासाठी

दुस–या शेतात पाठवित असत. तसेच अर्जदार हिच्या चारित्र्यावर संशय घेउन शिवीगाळ करुन मारहान करीत असत. तसेच अर्जदार क्र. १ हिस जबरदस्तीने फारकत घेण्यासाठी मागणी करत असे. फारकत नाही दिली तर तुला मारुन टाकु अशी धमकी देत असत. दिनांक ०१.१२.२०१८ रोजी गैरअर्जदार यांनी अर्जदार क्र. १ हिच्या पोटात, पाठीत, लाथाबुक्यांनी मारहान करुन माहेरी पाठविले. सबब, तेव्हापासुन अर्जदार ही नाईलाजास्तव अर्जदार क्र. २ व ३ सह माहेरी राहत आहे. त्यामुळे अर्जदार हिने गैरअर्जदार यांचेकडून स्वतःकरीता व मुलां करीता रक्कम रुपये १६,०००/– दरमहिना आर्थिक पोटगी मिळण्याची मागणी केलली आहे.

**३.** गैरअर्जदार हे हजर होऊन (नि.क्र.२१) वर म्हणणे दाखल करुन असे कथन केले आहे की, अर्जदार क्र. १ हि गैरअर्जदार क्र. १ याच्याकडे नांदण्यास गेली असता तीन ते चार महिने व्यवस्थतीत नांदली. त्यानंतर ती एकत्र कुटुंबातुन वेगळे राहण्यासाठी हटट धरु लागली. त्यामुळे गैरअर्जदार क्र. १ याने अर्जदार हिला सुरत येथे नेले असता तेथेही अर्जदार हि गैरअर्जदार क्र. १ यास आत्महत्या करण्याची व पळुन जाण्याची, धमकी देत असत. अर्जदार हि गैरअर्जदार क्र. १ यास नेहमी त्रास देत असत. तसेच तिचे संसारात मन रमत नसल्यामुळे तीने गैरअर्जदार यांच्याविरुध्द विविध कार्यालयात विविध प्रकारचे तक्रारी केलेल्या आहेत. तसेच अर्जदार ही गैरअर्जदार क्र. १ यांच्या बहिणी माहेरी आल्यास त्यांच्यासोबत कधीही व्यवस्थीत बोलत नसत, वाद विवाद, भांडण तंटा, करीत असत. अर्जदार हि हेकेखोर व हुकुमशाही स्वभावाची आहे. अर्जदार ही गैरअर्जदार यांच्याशी भांडण तंटा करुन, धमक्या देउन स्वतःच्या मर्जीने, स्वखुशीने गैरअर्जदार क्र. १ चा त्याग करुन माहेरच्या लोकांच्या सागण्यावरुन माहेरी राहत आहे. अर्जदार हिस गैरअर्जदार क्र. १ सोबत संसार करण्याची इच्छा नसल्यामुळे केवळ गैरअर्जदार यांच्या मालमत्तेत हक्क निर्माण व्हावा तसेच पैसे उकळण्यासाठी व त्यांना त्रास देण्यासाठी जाणुनबुजुन सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. संबब, अर्जदार ही स्वतःच्या मर्जीने माहेरी राहत असल्यामुळे सदरचा अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली.

**४.** माझे विचाराधीन निघालेले मुद्दे व त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह खालील प्रमाणे देता येतील.

| अ.नं | मुद्दे | निष्कर्श |
|---|---|---|
| १. | अर्जदार ही गैरअर्जदार यांच्या विरूध्द अंतरिम पोटगी स्वतःकरीता व मुलांकरीता रक्कम रुपये १६,०००/- दरमहिना आर्थिक सहाय्य मिळण्यास पात्र आहे का ? | **अंशतः होकारार्थी** |
| २. | आदेश काय ? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

## <u>कारणमिमांसा</u>

**<u>मुद्दा क्र १ करीताः-</u>**

५. अभिलेखाचे अवलोकन केले अर्जदार व गैरअर्जदार यांच्या तर्फे विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला यावरून हे स्पष्ट होते की, गैरअर्जदार क्र. १ व अर्जदार यांचा विवाह व सदर विवाहबंधनातुन काजल व सुहानी अशा दोन मुलींचा जन्म ही निर्विवाद बाब आहे. अर्जातील गैरअर्जदार क्र. १ हे अर्जदार यांचे पति आहेत व गैरअर्जदार क्र. २ व ३ हे अर्जदार हिचे सासु सासरे आहेत. गैरअर्जदार क्र. ४ व ५ जेठ व जेठाणी तसेच गैरअर्जदार क्र. ६ व ७ हे ननंद व नंदई आहेत. अशा परिस्थितीत अर्जदार व गैरअर्जदार यांचे दरम्यान कौटूंबिक नातेसंबंध प्रस्थापित होतात.

६. अर्जदार हिने तिला गैरअर्जदार यांच्या मार्फत होणा-या कौटूंबिक छळा बाबत कथने केली आहेत. गैरअर्जदार यांनी ती कथने आपले म्हणणे देवून नाकारली आहेत. अशा परिस्थितीत अर्जदार हिच्या अर्जातील कथने व अर्जासोबत दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रावरून अंतरिम अर्जाचा विचार करते वेळीस अर्जदार हिने सकृत दर्शनी तिला होत असलेल्या कौटूंबिक छळा बाबत शाबीत करणे अभिप्रेत आहे.

७. अर्जदार हिचे असे कथन आहे की, ती कौटूंबिक हिंसाचाराची बळी आहे. त्यामुळे होणाऱ्या कौटूंबिक हिंसाचारापासुन संरक्षण मिळण्याची विनंती केली आहे. त्याचबरोबर तिने स्वतःकरीता व मुलांकरीता दरमहा रक्कम रूपये १६,०००/- इतकी अंतरिम पोटगी सामनेवाला यांच्याकडुन मागीतलेली आहेत. त्याकरीता महिलांचे कौटूंबिक हिंसाचारापासुन संरक्षण कायदा

सन २००५ च्या कलम २३ चे अवलोकन करणे गरजेचे आहे. कलम २३ प्रमाणे सामनेवाला कौटूंबिक हिंसाचार करीत आहे किंवा त्याने केला आहे, किंवा सामनेवाला कौटूंबिक हिंसाचार करण्याची शक्यता आहे असे केलेल्या अर्जाअन्वये प्रथम दर्शनी उघड झाले आहे असे दंडाधिकाऱ्याचे समाधान झाले असेल तर कलम १८, कलम १९, कलम २०, कलम २१ किंवा दाव्याप्रमाणे कलम २२ अन्वये सामनेवालाच्या विरूध्द व्यथित व्यक्तीने विहित नमुन्यात केलेल्या प्रतिज्ञापत्राअन्वये आदेश मंजूर करता येईल.

८. सदर अर्जामध्ये अर्जदार यांनी असे कथन केले आहे की, अर्जदार व गैरअर्जदार क्र. १ यांचा विवाह हिंदु रितीरिवाजाप्रमाणे दिनांक ११.०५.२०१४ रोजी झाला. लग्नानंतर अर्जदार हिला गैरअर्जदार यांनी एक वर्ष व्यवस्थीत नांदवले. त्यांनतर गैरअर्जदार हे अर्जदार हिला शिवीगाळ करणे, टोचुण बोलणे, तुझ्या बापाने हुंडा कमी दिला, असे म्हणुन अर्जदार हिच्याकडे माहेरहुन ५०,०००/- रुपये घेवून येणेकरीता तगादा लावुन शिवीगाळ व मारहाण करुन उपाशी पोटी ठेवीत असे. तसेच मोलमजुरी कामासाठी दुसऱ्यांच्या शेतात पाठवित असत. अर्जदार हिच्या चारित्र्यावर संशय घेउन शिवीगाळ करुन मारहाण करीत असत. सदर कथनांच्या पृष्टर्थ अर्जदार हिने कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही. अर्जदार हिने केलेली कथने गैरअर्जदार याने त्यांचे म्हणणे दाखल करुन नाकारलेली आहे व असे कथन केले आहे की अर्जदार हि हुकुमशाही व हेकेखोर स्वभावाची आहे. तसेच अर्जदार हि गैरअर्जदार यांचा आत्महत्या करण्याची व पळुण जाण्याची धमकी देते. अर्जदार हिने गैरअर्जदार यांच्या विरुध्द कोणतेही कारण नसताना तक्रारी केलेल्या आहे. तसेच ती नेहमी गैरअर्जदार यांच्यासोबत वाद विवाद व भांडणतंटा करीत असत. गैरअर्जदार यांने अर्जदार हिला कोणताही शारीरिक व मानसिक त्रास दिलेला नाही. सदर कथनांच्या पृष्टर्थ गैरअर्जदार यांनी कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही. परंतु अभिलेखाचे अवलोकन करता प्रथमदर्शनी असे दिसुन येते की, अर्जदार हि अर्जदार क्र. २ व ३ यांच्यासह तिच्या माहेरी राहत आहे ही बाब निर्विवाद बाब आहे. यावरुन प्रथमदर्शनी असे दिसुन येते की, अर्जदार व गैरअर्जदार यांच्यामध्ये कौटुंबिक वाद आहेत. अर्जदार हि अर्जदार क्र. २ व ३ यांच्यासह माहेरी राहत असताना गैरअर्जदार याने त्यांच्या पालणपोषणाची व संगोपणाची जबाबदारी घेतलेली आहे किंवा जबाबदारी घेत आहेत याबाबतचे कोणतेही कथन गैरअर्जदार यांनी केलेले नाही. यावरुन

प्रथमदर्शनी असे दिसुन येते की, अर्जदार हि अर्जदार क्र. २ व ३ यांच्यासह माहेरी राहत असताना गैरअर्जदार याने कोणतीही नैतिक जबाबदारी पार पाडलेली नाही.

९. अभिलेखाचे अवलोकन करता प्रथम दर्शनी अर्जदार ही कौटूंबिक हिंसाचाराची बळी ठरलेली आहे असा दर्शविणारा कोणताही कागदोपत्री पुरावा अथवा तोंडी पुरावा अभिलेखावर दाखल करण्यात आलेला नाही. परंतु पति या नात्याने अर्जदार यांची पालन पोषणाची जबाबदारी ही गैरअर्जदार क्र. १ यांची आहे. अर्जदार याने पुढे असे कथन केले आहे की, गैरअर्जदार क्र. १ हा नांदगाव तांडा येथे हॉटेल चालवितो. हॉटेल पासुन खर्च वजा जाता त्यास ३०,०००/- रुपये दरमहा उत्पन्न मिळते. गैरअर्जदार क्र. १ याच्याकडे नांदगाव येथे पाच एकर बागायती शेती आहे त्यात तो गहु, बाजरी, कपाशी ,मका इत्यादी पिके घेतो त्यातुन खर्च वजा जाता त्या वर्षाकाठी दोन ते तीन लाखाचे उत्पन्न मिळते. तसेच गैरअर्जदार क्र. १ याचे राहते घर असुन स्वतःच्या मालकीची जागा आहे. गैरअर्जदार क्र. १ हा अर्जदारास १६,०००/- रुपये पोटगी देवू शकतो व तशी त्याची ऐपत आहे. परंतु सदर कथनांच्या पृष्टर्थ अर्जदार हिने कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. त्यामुळे गैरअर्जदाचे नेमके उत्पन्न किती आहे याबाबत निश्चित निष्कर्ष काढता येते नाही. कौटूंबिक हिंसाचार कायद्याप्रमाणे अर्जदार हिने तिला होणारा कौटूंबिक छळ प्रथमदर्शनी शाबीत केल्यास कलम २३ अन्वये अंतरिम पोटगी मिळण्यास पात्र ठरते. सदर अर्जदार हीने गैरअर्जदार यांच्याकडे पोटगीची मागणी केलेली आहे. परंतु पत्नीच्या उदरनिर्वाहाची जबाबदारी प्रथमदर्शनी पतीची असते. अभिलेखावरून गैरअर्जदार क्र. १ यांच्या वरती असणाऱ्या जबाबदाऱ्या, सध्याचा महागाईचा वाढता दर, अर्जदार हिच्या गरजा, तसेच अर्जदार यांच्या ताब्यात असणाऱ्या काजल व सुहानी यांचे पालनपोषनाचा, औषधोपचाराचा, शिक्षणाचा विचार करता गैरअर्जदार क्र. १ याचे उत्पन्न पाहता अर्जदार हि गैरअर्जदार क्र. १ यांच्या कडून स्वतःकरीता दरमहा रक्कम रूपये १,०००/- ( एक हजार रुपये) व अर्जदार क्र. २ व ३ करीता प्रत्येकी रक्कम रुपये १,५००/- अशी एकुण रक्कम रुपये ४,०००/- फक्त अंतरिम पोटगी मिळणेस पात्र आहे. म्हणून मी मुद्दा क्र.१ चा निष्कर्श केवळ सामनेवाला क्र. १ यांच्या करीता अंशतः होकारार्थी देते व मुद्दा क्र. २ च्या अनुषंगाने खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

4/11/23

## आदेश

१. अर्ज अशंतः मंजूर करण्यात येतो.

२. सामनेवाला क्र. १ याने अर्जदार क्र. १ हिला दरमहा रक्कम रुपये १,०००/-(एक हजार रुपये) व अर्जदार क्र. २ व ३ करीता प्रत्येकी रक्कम रुपये १,५००/-( एक हजार पाचशे रुपये प्रत्येकी ) अशी एकुण रक्कम रुपये ४,०००/-(चार हजार रुपये) फक्त इतकी अंतरिम पोटगी अर्ज दाखल तारखे पासुन द्यावी.

३. सदर आदेशाची प्रत अर्जदार हिला विनामुल्य देण्यात यावी.

(खुल्या न्यायालयात घोषित)

4/11/23

**( श्रीमती अ. ई. आवटी )**

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी (कोर्ट नं.२), कन्नड.

कन्नड

दिनांक ०४.११.२०२३